Peer reviewed Journal Impact Factor: 7.265 ISSN-2230-9578

2020-2021

# Journal of Research and Development




***A Multidisciplinary International Level Referred Journal***

**July 2021 Volume-11 Issue-27**

## *Impact of Environment on Agriculture, Health, Water Resources, Social Life & Industrial Development*



**Chief Editor**
**Dr. R. V. Bhole**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon




| Executive Editors | Executive Editors | Executive Editors |
| --- | --- | --- |
| **Dr. M. N. Kolpuke**<br>Principal,<br>Maharashtra Mahavidyalaya, Nilanga | **Dr. S. S. Patil**<br>Principal,<br>Maharashtra College of Pharmacy, Nilanga | **Dr. E. U. Masumdar**<br>Principal,<br>Azad Mahavidyalaya, Ausa |

Co- Editors

Dr. B. N. Paul, Dr. C.J. Kadam, Prof. T. A. Jahagirdar, Dr. Naresh Pinamkar
Dr. C. V. Panchal, Dr. Nisar Syed, Mr. Santosh P Mane





**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102



'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 20 July-2021, Volume-11, Issue-27
Impact of Environment on Agriculture, Health, Water Resources, Social Life & Industrial Development

# CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1. | "पर्यावरण संवर्धन काळाची गरज" प्रा. डॉ. अंभुरे एस. डी. | 1-3 |
| 2 | वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शारीरिक शिक्षणविषयक अभिवृत्तीचा चिकित्सक अभ्यास श्री सावळे शरद अरुण | 4-7 |
| 3 | छत्रपती शिवाजी महाराजांची जल व्यवस्थापन पद्धती – एक अभ्यास Dr. Ladaf S.K | 8-10 |
| 4 | दुष्काळ आणि शेतकरी आत्महत्या : विशेष संदर्भ शेतकरी दीर्घकाव्य प्रा डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | 11-13 |
| 5 | रवींद्र शोभणे यांच्या साहित्यात पडलेले दुष्काळाचे प्रतिबिंब आणि आजचे वास्तव प्रा. डॉ. सुनिल भावराव देसले | 14-17 |
| 6 | "जलसंवर्धित ग्रामीण अर्थव्यवस्था आणि विकास" प्रा. डॉ. खिस्ते ओंकार बाळकृष्ण | 18-20 |
| 7 | "भारतीय शेती विकासाचा अभ्यास" डॉ. राजाराम महादेव थोरात | 21-25 |
| 8 | चंदगड तालुक्यातील जलव्यवस्थापनाचा इतिहास Dr.Madhukar Vithoba Jadhav | 26-29 |
| 9 | लोकसंख्येचा विस्फोट पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारणीभूत डॉ. कविता मते | 30-32 |
| 10 | पर्यावरण संवर्धन : काळाची गरज प्रा. डा. हेमचंद दुधगवळी | 33-34 |
| 11 | कोविड — 19 का भारतीय अर्थव्यवस्था पर प्रभाव प्रा. मोरेश्वर भिकाजी शेन्डे | 35-38 |
| 12 | ग्रामीण विभागातील कृषी विकासाचा चिकित्सक अभ्यास डॉ. राजेंद्र तुळशीदास आहिरे | 39-42 |
| 13 | दुष्काळजन्य परिस्थिती चे साहित्यातील चित्रण विकास नामदेव लोंढे | 43-46 |
| 14 | जलव्यवस्थापन काळाची गरज डॉ. डी. एम. कदम | 47-50 |
| 15 | चळवळी आणि हिंदू तत्वज्ञान यांची सांस्कृतिक व राजकीय चर्चा करणारा मौलिक ग्रंथ' प्रा. डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले | 51-53 |
| 16 | पर्यावरण आणि समाज प्रा. डॉ. मंगला कडवे | 54-56 |
| 17 | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा - जिल्हा रायगड ही एक रायगड जिल्ह्यातील बचत गटांना प्रोत्साहित करणारी संस्था प्रा. शत्रुघ्न नामदेव लोहकरे, प्रा. डॉ. मनीषा कर्णे | 57-59 |
| 18 | भारतातील कृषि आणि जलसिंचन सुविधांचा आढावा पांचाळ विजय किशनराव | 60-62 |
| 19 | नागपूर शहर में अपशिष्ट जल प्रबंधन; धारणीय विकास की ओर एक पहल स्वाती रमेश भोवते, डॉ.अविनाश व. तलमले | 63-67 |
| 20 | "जल प्रदूषण आणि मानवी आरोग्य" प्रा.डॉ.अनिल निवृत्ती शिंदे | 68-72 |
| 21 | शेतकरी आत्महत्या व समाजकार्य कर्त्यांची भुमिका डॉ. मनोज श्रीकृष्णराव पवार | 73-76 |
| 22 | शेतकऱ्यांच्या समस्या आणि शेती विकास एक विश्लेषणात्मक अध्ययन प्रा.डॉ. प्रशांत रा. देशमुख | 77-81 |
| 23 | चंद्रपूर परिसरातील कोळसा खाणिचा स्थानिक पर्यावरणावर होणारा परिणाम अमोल काशीनाथ वावने, मनिषा दूधराम ठवरे | 82-84 |
| 24 | पर्यावरण संवर्धनात आदिवासींचे योगदान प्रा. डॉ.भास्कर गायकवाड | 85-88 |




PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

पर्यावरण प्रदूषण आणि शोषण पासून वाचवण्याच्या प्रक्रियेला "पर्यावरण संवर्धन" म्हटले जाते. पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि आपल्या पिढिला पर्यावरण संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. हे समजून सांगणे खूप आवश्यक आहे.

पर्यावरण संवर्धन महत्वाची कार्य:-

पर्यावरण संवर्धनातले महत्व आपल्याला प्राचीन काळा पासून अनेक ऋषीमुनी व मध्ययुगीन काळात अनेक संतानी सांगीतले आहे. आज सुध्दा पर्यावरण संवर्धन अनेक संस्था व सामाजिक संघटणाकडून होत आहे. प्राचीन काळात जैन धर्मातील २४ वे तिर्थंकार भगवान महावीर यांनी म्हटले होते की, "माणसाने माणसाची हत्या करणे ही हिंसा आहे आणि म्हणून ती करू नये तसेच वृक्ष वेली यांना देखील इजा पोहचू नका. कारण तीही एक हिंसाच असते. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही मानवजातीला उपकारक दृष्टी भगवान महाविरानी दिली आहे. तसेच पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचे कार्य इ.स. तिसऱ्या शतकात सम्राट आशोकाने केले त्यानी वन्य जीव, जिवमात्राच्या शिकारीवर प्रतिबंध घातला ही माहिती आजही आशोकाच्या शिलालेखातून आपल्याला माहिती मिळते. प्राचीन काळापासून पाणी शुध्द व पवित्र ठेवावे असे म्हटले आहे. पर्यावरणाचे महत्व व संवर्धन करण्यासाठी जगभरात अनेक चळवळी झाल्या आहेत. त्या मध्ये उत्तर प्रदेश आताचे झारखंड राज्य येथे झाडाची कत्ल होऊनये म्हणून अनेक स्त्रीयांनी झाडाला मिठी मारून वृक्ष तोडणाऱ्याला विरोध करून जगाचे लक्ष वेधून घेतले विशेष म्हणजे हे आंदोलनाचे नेतृत्व स्थानिक महिलांनी केले. पर्यावरणाला धोका निर्माण करणाऱ्या जागतिक स्तरावरच्या या सारख्या घटनाची काही देशानी दखल घेतली. परंतू आज पर्यावरणाचा जागतिक स्तरावर हा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा संयुक्त राष्ट्रसंघाने १९७२ मध्ये मानवी पर्यावरण या विषयावर स्वीडनमध्ये स्टॉकहोममध्ये एका आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या मुळे शंभरवर देशानी भाग घेतला त्यात २६ सुत्री महाधिकार पत्र म्हणजे मॅग्नाचार्ट घोषित करण्यात आले. या परिषदे मध्ये काही घोषणा करण्यात आल्या. त्यामध्ये मानव हा पर्यावरणाचा रक्षक व भक्षकही आहे. आज भारतात पर्यावरण शिक्षण देण्यात येत आहे. पर्यावरणाच्या संरचनेचे, स्वरूपाचे आणि विविध घटकांचे ज्ञान देउन प्रत्येक व्यक्तीस जागरूक व जबाबदार नागरिक बनविणे गरजेचे झाले आहे. म्हणूनच शिक्षणाच्या सर्व स्तरावर आज पर्यावरण शिक्षण दिले जाते. पर्यावरण शिक्षणामुळे अध्ययनकर्ता पर्यावरणाच्या क्षेत्रातील समस्या व अव्हानाचे स्वरूप समजून घेऊन पर्यावरण संवर्धन करू शकतो.

पर्यावरण बदलाचे परिणाम:-

मानवी जीवनावर पर्यावरण बदल मुळे फार मोठा परिणाम होत आहे. पर्यावरण बदला मुळे अनेक देशातील ऋतूचक्र बदलत आहे. उन्हाळयात खूप पाऊस पडत आहे तर हिवाळयात खुप उकाडा होत आहे. कारण मोठया प्रमाणात आपण झाडाची कत्ल केली आहे. औदयोगिकरणा मुळे सिमेंट कॉंक्रिटची जंगले बनली आहेत. बरेच पक्षी नष्ट झाले आहेत. कोरोणा मुळे व लॉकडॉउन मुळे हवा शुध्द, गोंगाट, ध्वनीप्रदुषण कमी, कारखाने बंद राहिल्याने नदया स्वच्छ झाल्या. परंतू पर्यावरण संवर्धनासाठी हा पर्याय नाही. पर्यावरणाचा ऱ्हास होत राहिल तर अनेक साथीचे रोग होतील, या मध्ये सार्स, इबोला, निमा, चिकनगुनिया, मलेरिया, स्वाइन फ्लू आणि आता कोरोणा हे सारे साथीचे रोग पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन न केल्या मुळे निर्माण झाले आहेत.

समारोपण:-

निसर्गाने आपल्या आजु बाजूला फार अदभुत गोष्टी निर्माण केल्या आहेत. डिसकव्हरी किंवा जिओग्रोफी या सारखे अनेक टि.व्ही वरील चॅनल पाहिले तर आपल्याला आशचर्य वाटेल अशा गोष्टी दिसतात. आपल्या आजु बाजुला सुंदर फुले, हिरवी झाडे, वेगवेगळी रंग आणि रूप असलेले पक्षी इ. गोष्टी मन मोहून घेतात. यात मानवी जीवनात झाडाचे महत्व विशेष आहे. अशा काळात पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे. कारण पृथ्वीवरील अनेक प्राणी

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, 20 July-2021, Volume-11, Issue-25
Impact of Environment on Agriculture, Health, Water Resources, Social Life & Industrial Development

आपल्या भरण्यासाठी वृक्षावर अवलंबून आहेत. मनुष्य हवेत असलेला ऑक्सिजन हा प्राणवायू श्वसनाद्वारे ग्रहण करतो. अशा पध्दतीने वृक्ष मनुष्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. त्या मुळे पर्यावरणाचा ऱ्हास वेळीच रोखला नाही तर येत्या काळात ही खूप मोठी समस्या बनून जाईल. पर्यावरण संवर्धनाचे महत्व समजून जगभरातील देश वृक्ष लागवड व जास्तीत जास्त सीएनजी गॅस चा उपयोग करू लागले. पर्यावरण आपले भविष्य आहे. म्हणून त्याच्या संरक्षणासाठी आपल्याला वेळीच लक्ष द्यावे लागेल.

संदर्भ ग्रंथ-

०१. पर्यावरण संवर्धन काळाची गरज निबंध- मोहित पाटील www.bhashamarathi
०२. पर्यावरण संवर्धनाचे महत्व दि- १५ मार्च, २०१८ http/savitahusebloges.com
०३. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन- Dainik Parbhani
०४. पर्यावरण- दैनिक जागरण, १७ ऑक्टो, २०१७ खोडी, "पर्यावरण संरक्षण व स्वच्छता मोहिम.
०५. पर्यावरण व्यवस्थापन- vikaspedia- २१ जून, २०२१.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani